# जिल्हा परिषद, धुळे
## शिक्षण विभाग (प्राथमिक)

Website: www.zpdhule.com Email: education_p@zpdhule.com
दुरध्वनी क्रं.०२५६२/२४०१२०

जा.क्र.धुजिप/शिविप्रा/स्वयंअर्थ / ४५१ /२०१९ धुळे, दिनांक २१/०९/२०१९

प्रति,

अध्यक्ष / सचिव
शिरपुर एज्युकेशन सोसायटी,ता.शिरपुर जिल्हा धुळे
संचलीत जयश्रीबेन अमरिशभाई पटेल स्कुल,वाघाडी
ता.शिरपुर जिल्हा धुळे

विषय :- महाराष्ट्र स्वयं अर्थ सहाय्यित शाळा(स्थापन व विनीयमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वंयअर्थ सहाय्यित तत्वावर नविन शाळा स्थापन करणेसाठी सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरिता प्रथम मान्यता प्रमाणपत्र

संदर्भ :- १) महा.स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन ) अधिनियम २०१२.
२)शासन निर्णय क्रं.एसएफएस -१०१८/प्रक्र.११६२/एसएम-२ /मंत्रालय मुंबई ०३२ दिनांक ०३ नोव्हेंबर२०१८
३) म.शिक्षण उपसंचालक,नाशिक विभाग नाशिक यांचेकडील इरादा पत्र दि.१७/०१/२०१९

वरील संदर्भीय क्रं.१ ते ३ अन्वये मी शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प.धुळे संबंधित शाळेस स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावर सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठी नविन शाळा सुरू करण्यास खालील अटी व शर्तो वर प्रथम मान्यता प्रमाणपत्र देत आहे.

| अ.क्र. | तालुका | अर्जदार संस्थेचे नांव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नविन शाळा / दर्जा वाढ | मान्यता वर्ग इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | शिरपुर | शिरपुर एज्युकेशन सोसायटी,ता.शिरपुर जिल्हा धुळे | जयश्रीबेन अमरिशभाई पटेल स्कुल,वाघाडी ता.शिरपुर जिल्हा धुळे | इंग्रजी (सी.बी.एस.ई.) | नविन शाळा | इयत्ता १ ली ते १२ वी सर्व शाखा. | २०१९-२० |

**अटी व शर्ती**

१. संदर्भ क्रं.१ ते ३ अन्वये संस्थेचे शाळापरवानगीसाठी प्रस्तावित केलेले माध्यम व ठिकाण भविष्यात बदल करता येणार नाही.

२. शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरू केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली मान्यता शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासुन असेल.

३. आपल्या संस्थेने एकाचवेळी व एकाच जागेत पुर्व प्राथमिक/प्राथमिक/उच्च प्राथमिक/ माध्यमिक/उच्च माध्यमिक नविन शाळा यापैकी दोन किंवा त्यापेक्षा जास्त शाळा अथवा एकाच जागेत दोन भिन्न माध्यमांच्या नविन शाळा प्रस्तावित केलेल्या असल्यास व त्यापैकी दोन किंवा त्याहुन जास्त शाळांना शासन निर्णय दिनांक ३ नोव्हेंबर २०१८ अन्वये परवानगी मिळालेली असल्यास त्यापैकी खालच्या स्तरावरील केवळ एकच नविन प्राथमिक शाळा सुरु करता येईल तसेच सन २०१९-२० पासुन त्या शाळेचा सर्वात खालचा वर्ग सुरू करता येईल.त्यांनतरचे वर्ग नैसर्गिक वाढीने टप्याटप्याने सुरु करण्याची परवानगी देण्यात येईल.

४. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वरचे वर्ग सुरू करता येणार नाही त्या खेरीज सुरू केलेले वरचे वर्ग सुरू करता येणार नाही. त्याखेरीज सुरू केलेले वरचे वर्ग अनाधिकृत मानले जातील .

५. आरटीई २००९ मधील निकषानुसार दरवर्षी पटसंख्येच्या आधारे समक्ष प्राधिका-याकडून वेळोवेळी पट निश्चिती करुन घेऊन त्या पदांवर प्रचलीत नियमानुसार पात्र शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी नियुक्त करुन त्यांच्या नियुक्त्यांना आपल्या जिल्हयाच्या शिक्षणाधिकारी (प्राथ) यांचेकडून वैयक्तिक मान्यता देणे आवश्यक राहील.

६. परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच आरटीइर् २००९ मधील तरतुदी व महाराष्ट्र स्वयंअर्थसहय्यित शाळा (स्थापन व विनिमयन) मुख्य अधि नियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. भविष्यात स्वयंअर्थ् सहाय्यित शाळा (स्थापन व विनिमयन) २०१२ मधील अंतर्गत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावासोबतची कागदपत्रे विधिग्राहय नसल्याचे निष्पन्न झाल्यास शासन निर्णय दिनांक ३ नोव्हेंबर २०१८ अन्वये देण्यात आलेली मान्यता विषयक कार्यवाही रद्द बदल समजण्यात यावी.

८. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहितीकरीता स्वयंअर्थ सहाय्यित तत्त्वावरील परवानगी पात्र नविन शाळा / वर्ग असे दर्शविणार फलक लावणे बंधनकारक राहील व वेळोवेळो करण्यात येणा-या पत्रव्यवहार स्वयंअर्थ सहाय्यित शाळा व वर्ग असे लिहिण बंधनकारक राहील.

९. महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना यु-डायसमध्ये माहिती भरतांना स्वयंअर्थ सहाय्यित शाळा किंवा वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे बंधनकारक राहील.

१०. सदरच्या शाळा चालविण्याबाबत शासनाने सध्या अस्तित्वात असलेले सर्व प्रचलित नियम व भविष्यात शासन वेळोवेळी विहीत कलेल अशा सर्व नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेवर तसेच शाळेवर बंधनकारक राहील.

(मनिष पवार)
शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, धुळे

**प्रत माहितीस्वत सविनय सादर-**

१. मा. शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक
२. गटशिक्षणाधिकारी ,पंचायत समिती, साक्री